VOL- IX ISSUE- XI NOVEMBER 2022 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.331 ISSN 2349-638x

# बालकामगार प्रथेची कारणे: एक दृष्टीक्षेप

प्रा.डॉ.मनोहर तोटरे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
शाहीर अण्णाभाऊ साठे महाविद्यालय, मुखेड ता.मुखेड जि.नांदेड

बालकामगार पध्दती ही समस्या वैश्वीक, भारतीय आहे. विशेषत: विकसनशील देश आणि मराठवाडया सारख्या मागास भागात कृषक क्षेत्रात मुला-मुलींना कामास जुंपतात. निर्वाही कृषी व्यवस्था आणि श्रमधिष्ठित उद्योग व्यवसायात मालक प्रौढकामगारा ऐवजी अल्पवेतनात बालश्रमिकास कामास जुंपतात. त्यामागे विविध कारणे दिसून येतात. अनुक्रमे १) कुटुंबातील दारिद्रय २) कुटुंबातील सदस्यांची निरक्षरता ३) अकुशल श्रमिक ४) कुटुंबातील व्यसनाधिनता ५) बालकाविषयी त्यांच्या संगोपनाबाबत अज्ञान, ६) बालक हक्कमागत नाहीत, अधिक वेतन मागत नाहीत, संघटना उभारत नाहीत, उद्योग व्यवसायात सुविधा मागत नाहीत त्यामुळे मालकांना, उद्योजकांना मुलांना रोजगारास लावणे सुलभ होते.

बिकट अर्थिक स्थिती असणा-या कुटुंबात, बालसुलभ वयात विटभट्टी, गॅरेज, हॉटेल, रसवंती, वेल्डींग, भंगार गोळा करणे, व्यवसायात पाठवितात कारण बहुतांशी कुटुंबे दारिद्रय रेषेखाली असतात. मुलांना काम दिल्याने कुटुंबाचे आर्थिक रक्षण होते, बाल श्रमिक, स्वस्त मजूर असतात त्यामुळे मालकांचे अधिक उत्पादन, नफा वाढतो.[३] कारण कायदे प्रभावीरित्या राबविले जात नाहीत.

बालकामगार पध्दतीचे मंथन करतांना यु.सी.शाहू यांनी सामाजिक,आर्थिक मागासलेपणा, निरक्षरता, बेकारी,गरीबी,महागाई, श्रम परंपरा, कुटुंबाचे अल्प उत्पन्न, पालकांचा कर्जबाजारीपणा, घटस्फोट, प्रौढांची बेकारी इत्यादीचे कारणे बालकामगाराच्या वाढत्या संख्येशी निगडीत संबोधली. कमला श्रीनिवासन आणि गंडोत्रा संपादीत ग्रंथात उषा कान्हेरे यांच्या भारतातील बालकामगार या लेखात. दिले जाणारे अल्प वेतन, पालकाची बालकाच्या भविष्याबाबत उदासिनता, शैक्षणिक सुविधांचा अभाव, वैद्यानिक तरतूदीची निष्फळ अमलबजावणी, परंपरावादी श्रम संस्कृती,श्रम करण्याचे निर्धारित वयाचे नियमनाचा अभाव इत्यादीचा कारणात परामर्श घेतला. अध्ययन कर्त्यास निरीक्षणात असे दिसून आले की,७६.६६ टक्के कुटुंबाचा आकार मोठा होता. (४ ते ९ सदस्य) वडीलाचे अकुशल व्यवसाय होते. (ता.क्र.३.१०) ज्यात कष्टाचे, श्रमाचे काम व अनिश्चीत मिळकत असणारे व्यवसाय होते त्यामुळे मुलांना कामास जुंपने ही अपरिहार्यता होती. संशोधकांच्या निरीक्षणात उत्तरदात्यांनी जे मत नमूद केले आणि नजीर शहा, राम अहूजा, शाहू, उषा कान्हेरे यांच्या निरीक्षणाशी अभ्यासक सहमत आहे.

**बालकामगार समस्यांची आर्थिक कारणे :**

बालकामगार समस्याच्या आर्थिक कारणात दारिद्रय, प्रौढांमधील बेरोजगारी, प्रौढांचे अपुरे उत्पन्न, या घटकांवर चर्चा करण्यात आली आहे.

**दारिद्रय :**

मूर्ती यांनी केलेल्या अध्ययनात दारिद्रय हेच बालकामगार समस्याचे कारण सांगीतले तर पी. आनंदराजकुमार यांना दारिद्रय, निरक्षरता प्रमुख कारण आढळून आले. १९६९ च्या लोकमत पाहणीच्या (Institute of Public Opinion) निष्कर्षात ४२.२ टक्के लोकसंख्या दारिद्रय रेषेखाली दिसून आली. त्यातील ५० टक्के लोकसंख्या खेडयातील अनूसूचित जाती, जमातीची होती. युनिसेफ च्या पाहणीत भारतातील ५० टक्के लोक दारिद्रय रेषेखाली जगतात. तर शहरातील १/३ लोक गलिच्छ वस्त्यात राहतात. गरीब कुटुंबातील मुलांना सक्तीने कामास पाठविले जाते. निपक्कडपच्या मते (NIPCCDP),लाखो दारिद्रय रेषेखालील मुलांना कामावर जावे लागते. विजय लक्ष्मी आणि आशिष सक्सेना यांनी तसेच बालकामगार समितीने दारिद्रय हेच बाल रोजगारास कारणीभूत संबोधले. तर आय.एल.ओ.च्या अहवालात प्रौढ कामगाराच्या समस्यातून बालश्रमिक समस्या निर्माण झाली असे मत नोंदविले. तळेकर यांना पालकांचा पाल्याकडे पाहण्याचा दृष्टिकोण या समस्याची वाढ करण्यास कारणीभूत वाटता तर नझीर अहमद शहा यांना गरीब व दुबळया कुटुंबातील पालक पाल्याच्या मिळकतीवर विसंबून राहतात. त्यातून ही समस्या निर्माण झाली. ओ.पी.शुक्ला च्या मते दारिद्रया बरोबर विषमतेमुळे मुले-मुली श्रम बाजारात येतात. सुमन चंद्रा यांना बहुविद्य कारणे जबाबदार वाटतात. ज्यात दारिद्रय, पालकांचे अज्ञान, निरक्षरता, कुटुंबाचा मोठा आकार, कायद्याची मंद

प्रक्रिया,स्वस्त मजूर तर श्रीमती फुटाने यांना शाळेत जाण्यापेक्षा चार पैसे मिळविलेले बरे ही पालकांची प्रवृती कारणे दिली. पुढील तालिकेतील कारणे निरीक्षकला आढळून आली ती उपरोक्त संशोधनाच्या निष्कर्षा अनुरुप दिसून आली.

**प्रौढांमधील बेरोजगारी :**

बालकामगारांच्या समस्याबाबत अशिष सक्सेना आणि विजयलक्ष्मी म्हणतात, 'गरिबीपेक्षा बेरोजगारी अधिक भयावह असते. अल्पवेतनामुळे लोक गरीब होतात. परंतु बेरोजगारी त्यांना पूर्णपणे गरीब करुन टाकते.' देशात बेरोजगारांची समस्या सतत वाढत आहे. जेंव्हा गरीब कुटुंबातील लोकांना रोजगार मिळत नाही. तेंव्हा उदरनिर्वाहचे संकट त्यांच्यापुढे निर्माण होते व अशावेळेस लहान मुलांना रोजगारावर कामाला जावे लागते. यातून बालकामगार पध्दतीस चालना मिळत जाते. दारिद्रय रेषेखालील लोकांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. नोंदणीकृत बेरोजगारी १९६६ पासून २ दशलक्षा वरुन आजपर्यंत २४ द.ल. पर्यंत पोहचली आहे. त्यांपैकी फक्त ९ टक्के लोक संघटित क्षेत्रात काम करतात त्यातील बहुतेक गरिब कुटुंबातील आहेत. औपचारिकरित्या असे लोक बांधील किंवा दास्यत्त्व पत्करलेली असतात. १६.५ द.ल. बालकामगार उपजिविकेसाठी काम करतात. बालकामगार प्रथेच्या संदर्भात दारिद्रय आणि बेरोजगारी हे दुष्ट चक्र आहे असे रोजर्स आणि स्टँडिंग[२२] यांनी म्हटले आहे. यामताशी सुसंगत निष्कर्ष प्रस्तुत अध्ययनात दिसून आला आहे. एकूण बालकामगारांपैकी ४३.६६ टक्के उत्तरदात्यांना त्यांच्या कुटुंबातील प्रौढांच्या बेरोजगारीमुळे त्यांना कुटुंबाच्या चरितार्थासाठी काम करावे लागत असल्याचे दिसून आले. अल्पशा उत्पन्नात स्वत:चेही पोट भरणे शक्य नसते. या बेरोजगारी अवस्थेमुळे कुटुंबाची दूर्दशा होते. बेरोजगारीवर उपाय म्हणून आई-वडीलच मुलांना कामास पाठवतात.

**कुटुंबातील प्रौढ लोकांचे अपुरे उत्पन्न:**

कुटुंबातील प्रौढ लोकांचे अपुरे उत्पन्न बालकामगार प्रथेस कारणीभूत आहे. पालकांचे अपुरे उत्पन्न आणि बालकामगार समस्या यांच्यात परस्पर सकारात्क संबंध असल्याचे मेधी इरानी दत्त यांनी त्यांच्या अभ्यासातून नमूद केले आहे. मुलांचे पालक, त्यांची उत्पन्न मिळविण्याची क्षमता जर कमी असेल तर, त्यांच्या मुलांना नोकरी करण्याची सक्ती करतात असे निरीक्षण एक परिसंवादात नोंदविले गेल्याचे कुलश्रेष्ठ यांनी म्हटले आहे.

प्रस्तुत अभ्यासातील एकूण उत्तरदात्यांपैकी ८४.३३ टक्के बालकामगारांनी त्यांच्या कुटुंबातील प्रौढ व्यक्तीचे उत्पन्न कुटुंबाचा चरितार्थ चालविण्यास अपुरे पडल्यामुळे त्यांना त्यांच्या पालकांनी सक्तीने किंवा काहीच्या बाबतीत नाईलाजाने काम करण्यास प्रवृत्त केल्याचे सांगितले.

लातूर शहरातील मोतीनगरमध्ये राहणारी १२ वर्षांची मुलगी. तिच्या घरची परिस्थिती अतिशय गरिबीची, वडील वारलेले, एक लहान बहीण आहे. सर्वजण एका भाडयाच्या छोटयाशा घरात राहतात. आई चार-पाच घरची धुणी भांडी करते. पण एकटीच्या पैशावर त्यांचे घरखर्च चालत नाही. चौथी शिकलेली मुलगी तीन वर्षांपासून आपल्या आईला घरखर्च भागविण्यासाठी मदत करत होती. शाळेमधील पाटी, पेन्सिल पुस्तकाचे हात धुणी भांडी करण्याच्या कामात गुंतलेले दिसून आले.

**बालकामगार समस्येची बिगर- आर्थिक कारणे :**

बिगर आर्थिक कारणांमध्ये निरक्षरता आणि अज्ञान, शैक्षणिक संस्थांचा अनाकर्षक परिसर, मोठे कुटुंब, स्थलांतर, शिक्षणाबाबत मुलांची, पालकांची उदासिनता, पालकांमध्ये असलेली व्यसनाधीनता, मुलांची काम करण्याची इच्छा, वडिलाचे निधन, आदी कारणांविषयी चर्चा करण्यात आली आहे.

**पालकांमध्ये निरक्षरता आणि अज्ञान :**

अज्ञानी पालक मुलांच्या शिक्षणाकडे दूर्लक्ष करतात. भारतीय कामगार मंत्रालयाच्या मतानुसार पालकांच्या मनात मुलांच्या शिक्षणाविषयी असलेली अजागृकता, उदासिनता, अज्ञान यामुळे बालकामगार प्रथा वाढत आहे. पालकांची निरक्षरता आणि अज्ञान बालकामगार समस्येचा मुख्य घटक आहे. मात्र पालकांना बालकामगार समस्या वाईट आहे, असे वाटत नाही जेन ॲडनच्यामते, "आजचे बालकामगार हे उद्याचे भिकारी आहेत. कारण हे कुठल्याही औपचारिक शिक्षण व ज्ञानाशिवाय वाढत आहेत आणि म्हणून यांचे तारुण्य विनाकारण खर्च होत आहे." पांडे यांच्या मताप्रमाणे, "उपलब्ध शैक्षणिक संधीचा लाभ मुलांनी घ्यावा याकडे निरक्षर पालक दूर्लक्ष करतात. परिणामी बालकामगार पध्दतीस चालना मिळते." अध्ययनासाठी निवडण्यात आलेल्या उत्तरदात्यापैकी ६०..३६ टक्के बालकामगारांचे पालक निरक्षर आहेत आणि शिक्षण घेणा-या बालकामगारांच्या पालकांमध्ये प्राथमिक शिक्षण घेणा-याचे प्रमाण अधिक आहे. एकूण उत्तरदात्यापैकी ३९ टक्के व्यष्टींनी त्यांना त्यांच्या पालकांच्या निरक्षरतेमुळे आणि अज्ञानामळे काम करावे लागत असल्याचे नमूद केले आहे.

**शैक्षणिक संस्थांचा (शाळांचा) अनाकर्षक परिसर :**

प्रस्तुत अभ्यासातील २१.६६ टक्के उत्तरदात्यांनी शाळांचे अंतर्बाहय स्वरुप, निराशाजनक व शाळेचे शैक्षणिक व्यवस्थापन उत्साहवर्धक नसल्यामुळे शाळेत मन लागत नाही, शिकण्यात त्यांना आवड निर्माण होत नाही. म्हणून शिक्षण अर्धवट सोडून नोकरी- व्यवसायाकडे वळल्याचे दिसून आले.

**मोठे कुटुंबः**

मोठे कुटुंब मुलांचे पालन-पोषण, संगोपण योग्य प्रकारे करू शकत नाही. कमी उत्पन्न आणि सदस्या संख्या जास्त यामुळे गरजा भागविणे कठीण जाते. ज्यामुळे अशा कुटुंबात मुलांना कामास पाठविले जाते. प्रस्तुत अध्ययनात मोठे कुटुंब आणि बालकामगार पध्दतीचा संबंध दिसून आला. ७७.६६ टक्के उत्तरदात्यांना त्यांच्या मोठया कुटुंबामुळे बाल वयात श्रम करावे लागत असल्याचे आढळून आले.

**स्थलांतर :**

वास्तव्य असलेल्या गावी कुटुंबाचा चरितार्थ चालविणे कठीण झाल्यामुळे २२.३३ टक्के उत्तरदात्यांच्या पालकांनी लातूर शहरात स्थलांतर केल्याचे दिसून आले आहे. स्थलांतर करण्यामागचा त्यांचा उद्देश स्वतःला आणि त्याचबरोबर त्यांच्या मुलांना शहरात नोकरी-व्यवसाय मिळविणे हा आढळून आला.

**शिक्षणाबाबत मुलांची उदासिनता :**

मुलांच्या मनामध्ये शिक्षणाविषयी असलेली निरस आणि कंटाळवाणे शिक्षण, शिक्षणाबाबत असणारा पालकांचा भ्रमनिरास, शिक्षणानंतर नोकरी नाही. यामुळे अनुत्सुकता यामुळे बालकामगार पध्दतीस चालना मिळते. शिक्षण घेण्याची आवड नसल्यामुळे ३५.६६ टक्के उत्तरदात्यांनी श्रम बाजारात दाखल झाल्याचे मत नोंदविले.

**पालकांमधील व्यसनाधीनता :**

व्यसनाधीन पालक त्यांचे उत्पन्न व्यसनावर खर्च करतात. अध्ययनातील एकूण उत्तरदत्यापैकी ७७.६६ टक्के बालकामगारांच्या कुटुंबातील सदस्य हे व्यसनाधीन आहेत. बहुतांश उत्तरदात्यांना पालकांच्या व्यसनाधीनतेमुळे श्रम करावे लागतात. असे नमूद केले आहे. तिवारीच्या मते, बालकामगार प्रथेस केवळ पालकांची व्यसनाधीनताच कारणीभूत नाही तर मद्यपान करणे, जुगार खेळणे, अंमली पदार्थाचे सेवन करणे, वेश्यागमन या पालकांना असलेल्या वाईट सवयीमुळे कुटुंबात जी परिस्थिती निर्माण होते त्या परिस्थितीच्या रेटयामुळे मुलांना काम करावे लागते.

**मुलांची काम करण्याची इच्छा :**

प्रस्तुत अभ्यासातील ११.६६ टक्के उत्तरदात्यांनी स्वेच्छेने आणि त्यांच्या पालकांनी संमती दिल्यामुळे नोकरी- व्यवसाय करत असल्याचे नमूद केले.

**वडिलाचे निधन :**

कुटुंबातील पालकांचे निधन हे बालकामगार पध्दतीचे एक कारण दिसून आले आहे. मूर्ती यांनी ही कुटुंबातील आई-वडिलांचे किंवा दोघांचेही निधन झाल्यास कुटुंबातील मुलांना काम करणे भाग पडले असे म्हटले आहे. तर प्रस्तुत अभ्यासातील ८.३३ टक्के उत्तरदात्यांच्या वडिलांचे निधन झाल्यामुळे कुटुंबाच्या चरितार्थासाठी श्रम बाजारात बालकामगार म्हणून दाखल झाल्याचे सांगितले आहे.

प्रस्तुत अभ्यासात जी गृहीतकृत्ये मांडण्यात आली आहेत. त्या संबंधीची चर्चा खाली करण्यात आली आहे.

- केवळ आर्थिक कारण (दारिद्रय) हेच एकमेव कारण बालकामगार प्रथेला कारणीभूत असत नाही. तर बिगर-आर्थिक कारणे ही या प्रथेला कारणीभूत असू शकतात. या प्रस्तुत अभ्यासातील गृहीतकृत्यांच्या संदर्भात असे आढळून येते की, आर्थिक कारणाव्यक्तिरिक्त बिगर-आर्थिक कारणात पालकांमध्ये निरक्षरता, शिक्षण घेणे बाबत मुला-मुलींची उदासिनता, शाळांचा अंतर्बाहय अनाकर्षक परिसर, मोठे कुटुंब, स्थलातंर, पालकांमधील व्यसनाधीनता, मुलांची काम करण्याची इच्छा, वडिलांचा किंवा कमवत्या व्यक्तींचा मृत्यु बालकामगार पध्दतीला कारणीभूत असल्याचे आढळून आले आहे. तसेच काही अभ्यासकांनीही दारिद्रय हेच एकमेव कारण बालकामगार प्रथेला जबाबदार नाही असे नमूद केले आहे. प्रस्तुत गृहीतकृत्ये सिध्द झाले आहेत.
- विशेषतः पालकांचे अज्ञान आणि निरक्षता, मुला-मुलींमध्ये शिक्षण घेण्याबाबत असलेली उदासिनता, आणि शाळांचा अंतर्बाहय अनाकर्षक परिसर ही शिक्षणाशी संबंधित बिगर-आर्थिक कारणे इतर बिगर-आर्थिक कारणांच्या तुलनेत बालकामगार प्रथेला चालना देण्यास आधिक प्रभावी ठरु शकतात. प्रस्तुत अभ्यासातून असे आढळून आले आहे की, शिक्षणाशी संबंधितही बिगर-आर्थिक कारणे, इतर बिगर-आर्थिक कारणांच्या तुलनेत बालकामगार प्रथेला चालणा देण्यास आधिक प्रभावी ठरली आहेत. प्रस्तुत अभ्यासातील हे गृहीतकृत्ये सिध्द झाले आहेत.

**बालकामगार समस्येला कारणीभूत असलेली इतर कारणे :**

अप्रत्यक्षरित्या बालकामगार समस्येला कारणीभूत असणारी इतरही काही कारणे आहेत. ज्यात औद्योगिकरण आणि नागरीकरण, लोकसंख्या वाढ, श्रम कायद्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे न करणे, कुटुंब निर्वाह भत्याचा अभाव, बालकामगारांविषयी मालक वर्गाचे मत, आदीचा अंर्तभाव होतो.

**औद्योगिकरण आणि नागरीकरण :**

औद्योगिकरणामुळे मोठया प्रमाणात उद्योग-धंदे वाढले. दळण-वळणाची साधने वाढली. बाजारपेठेचा विस्तार झाला. शहरांच्या कक्षा वाढल्या,त्यामुळे कुटुंबातील काही सदस्य शहरी

उद्योगधंद्यात जाऊन मजूरी करु लागले. मोठया प्रमाणावरील औद्योगिकरणामुळे कारखाने, कार्यशाळा आणि इतर अनियंत्रित व्यवसायांमध्ये मुले नोकरी करतांना दिसू लागली. यास्तव औद्योगिकरण आणि नागरीकरण या दोन्ही प्रक्रिया बालकामगार समस्येला चालना देणा-या आहेत, असे दिसून येते. लातूर शहराचा औद्योगिक, नागरी विकास झाल्याने स्थलांतर वाढले, उद्योग व्यवसायात बालरोजगार वाढले. ज्यात गॅरेजमध्ये, हॉटेलात काम,पेप्सी विक्री, भंगार गोळा करणे, पेपर विकणे इत्यादी व्यवसाय बालकामगार औद्योगीकरण, नागरीकरणाच्या प्रभावाने सुरु झाले.

**कुटुंब निर्वाह भत्त्याचा अभाव :**

भारतामध्ये कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी आवश्यक अशा भत्यांचा अभाव आहे. म्हणून कुटुंब एका दर्जेदार पध्दतीने जीवन जगण्यास असमर्थ आहे. कुटुंबाच्या कमी उत्पन्नामुळे पालकांना मुले सांभाळण्यात अडथळा निर्माण होतो. कुलश्रेष्ठ यांच्य मते, गरीबी योजना व निर्वाह भत्त्याचा अभाव, स्वस्त दरात श्रम हे बालकामगार प्रथेची कारणे आहेत.

प्रस्तुत अध्ययनातील उत्तरदात्यांच्या संदर्भात त्यांच्या सर्वांगीण कल्याणासाठी कुटुंब निर्वाह भत्त्याची किंवा अशाच एखाद्या परिणामकारक उपक्रमाची उपलब्धता आवश्यक आहे, असे आढळून आले.

**बालकामगार- स्वस्त मजूर :**

“बालकामगार कामावर घेणे म्हणजे कमी गुंतवणूक व जास्त नफा होय असे मानले जाते.” जेरॉम डेव्हीसच्या मते, “दारिद्रयाच्या अनिवार्यते शिवाय कुटुंबात बालकामगार हे एक प्रेरक म्हणून काम करतात आणि जे की, स्वस्त व अधिक नफा देणारे आहे.” तर नजिरशहा यांच्या मते, बालक जास्त आहेत म्हणून बालकामगार पध्दत आस्तित्वात नाही तर त्यांचे मजूरी दर कमी आहे. (स्वस्त मजूर) म्हणून अस्तित्वात आहे. तसेच प्रौढ कामगारांच्या तुलनेत बालकामगार अधिक आज्ञाधारक असतात. अशा बालकामगारांमुळे मालक संकटमुक्त असतात. कमी वेतनात कामाचे निश्चित तास न ठरविता त्यांच्याकडून अधिक तास काम करवून घेतात.

बालकामगार अधिक कामाचा मोबदला, महागाई भत्ता, वैद्यकीय सुविधा मागत नाहीत, अल्पवेतनात अधिक काम करतात हे गृहीतकृत्ये सिध्द झाले आहे.

**लोकसंख्यावाढ :**

सन २००१ च्या जनगणनेनुसार लातूर तालुक्याची लोकसंख्या ५,४२,४१४ असून त्यापैकी १०,७०४ कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहेत ज्यांना मूलभूत गरजा भागविणे देखिल कठीण आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे बेकारी,बालकामगार समस्या वाढत आहे. या वाढत्या बेकारीमुळे परावलंबी लोकसंख्येचे प्रमाण वाढत आहे. परिणामी बालकामगारांच्या संख्येत दिवसें-दिवस वाढ होत आहे.

मजुराच्या घरात जन्माला येणारे ‘मूल’ बालमजूर म्हणून जन्म घेते व अगदी सहजरीत्या बालकामगार म्हणून सामावून जाते.

**बालकामगार समस्येला प्रतिबंध करणा-या श्रम कायद्यांच्या अंमलबजावणी बाबत उदासिनता:**

बालकामगारांच्या शोषणाचे मूलभूत कारण केवळ वैधानिक तरतूदीने बाल श्रमिकांचे संरक्षण होत नसून कायद्याची अयोग्य अंमलबजावणी आहे. प्रामुख्याने कायद्याची अंमलबजावणी करणारा संबंधीत कर्मचारीवर्ग अप्रामाणीकपणे काम करतो त्यामुळे वैधानिक तरतूदींचे उपाय विफल ठरले आहेत. त्यामुळे बालकामगारांच्या जीवनमानात आणि कामाच्या स्थितीत सुधारणा झाली नाही.

बालकामगार समस्येला प्रतिबंध करण्यासाठी स्वातंत्र्य पूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात अनेक कायदे केले गेले. परंतु या कायद्यांची अंमलबजावणी परिणामकारकपणे होत नाही. प्रा. बक्षीच्या शब्दात,“भारतामध्ये स्वतःच्या स्वार्थासाठी कायदयांना पायदळी तुडवले जाते, त्यांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. लातूर शहरात आणि तालुक्यातील ग्रामीण भागात ज्या ठिकाणी बालकामगार श्रम करतात त्या ठिकाणी श्रमनिरीक्षक भेट देत नाहीत किंवा मालक बालकामगराचे नोंदणी पुस्तक ठेवत नाहीत असे सर्वच उत्तरदात्यांचे मत आहे. यावरून प्रशासकीय यंत्रणा अकार्यक्षम असल्याचे आढळून येते.

**बालकामगारांविषयी मालक वर्गाचे मत :**

मालकांशी अनौपचारिक चर्चा केली असता मुलांना कामात सामावून घेतल्यामुळे त्यांच्या आई-वडिलांचे उत्पन्न वाढते. तसेच मुले आळस, वाईट सवयी पासून दूर राहतात असे बहुसंख्य मालकांचे मत दिसून आले. बालश्रमिक कुठल्याही प्रकारची संघटना किंवा विरोध करु शकत नाहीत. म्हणून ते प्रौढाच्या तुलनेत सोयीस्कर असतात. मुले अधिक वेतन मागत नसतात तसेच इतर वैद्यकीय सुविधा यांचा पाठपुरावा करत नाहीत. पी. आनंदराज कुमार यांच्या अध्ययनात “मालकांच्या दृष्टीने मुले ही नियंत्रण ठेवणे, शिस्त लावणे या दृष्टीने उपयुक्त असतात. तसेच मुलांना लाडीगोडी लावता येते, शिक्षा करता येते आणि त्यांना इतर धोकादायक संगतीपासून वाचविता येते.” मालकवर्गाचे मत आणि बालकामगार पध्दतीचा संबंध दिसून आला.

**संदर्भ**


१. National Institute of Public Co-operation and Child Development (NI PCCDP-Seminar Recommendations).

२. Vijay Laxmi and Ashish Saxena, Causes and Cures (Edi.) Murthy's, Child Labour in India, RBSA Publishers, Jaipur, 2001, P. 106.

३. Report of ILO, Quoted In the book Needs of Children Published by, UNICEF, P. 144.

४. डॉ.डी.एन.तळेकर, आपले हक्क आणि त्यांची अंमलबजावणी, प्राची प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९९७ पृ.क्र. १२६.

५. Nazir Ahamad shaha, Child Labour in India, Anmol Publication, New Delhi, 1992. P. No. 35.

६. O. P. Shukla, Child Labour Problem in India-Analysis" IEA Conference (83rd) Volume of the Millenium, Jammu University, The Indian Economic Association, Calcutta, 2000, P. 595.

७. Suman Chandra, Problems and Issues- Child Labour, Social Action, Vol, 48. Journal, S.L. Raj, New Delhi. 1998. Pp. 27-28.

८. श्रीमती वं. प्र. फुटाणे, लेख- बालकामगारांचे शिक्षण, शिक्षण संक्रमण महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यामिक शिक्षण मंडळ, पुणे, फेब्रुवारी, २००६, पृ. क्र. ३८.

९. Arti. Ashish Saxena, and Vijay Laxmi, Child Labour Its Causes and Remedy, (Edi) Muthy S., Child Labour in India, RBSA Publishers, Jaipur, 2001, P.107.

१०. डॉ. मृणालिनी फडणवीस/ डॉ. प्राची देशपांडे, श्रम अर्थशास्त्र, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर. प्र.आ.२००२, पृ.क्र. ५०६.

११. U.C. Sahoo, Arti, Child Labour Dimensions in India, An Appraisal (Edi,) Tripathy, Child Labour in India, Discovery Publishing House New Delhi, 1995. P. 37.